सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २७४ | शुक्रवार, दि. २६ जून २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com



**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**
**आजचे भाव**

२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १४३०००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १३००००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ १०९०००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २२३०/-
भाव प्रती १० ग्राम

**आजचे अभीष्टचिंतन**



श्री. गिरीश पाटील
सरपंच, अमळगाव

श्री. पंकज मुंदडा
संचालक : खा. शि. मंडळ


# उपनगराध्यक्ष निकम यांनी केलेली टाक्यांची सफाई आणि माजी सत्ताधाऱ्यांची केलेली धुलाई...

## याबद्दल 'कहीं खुशी...कहीं गम'च्या प्रतिक्रिया...!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पालिकेचे उपनगराध्यक्ष श्री. प्रशांत निकम यांनी पाण्याच्या टाकीतील दीर्घकाळापासून साठलेल्या गाळाची सफाई करत असतानाच त्याबाबत जबाबदार असणाऱ्या माजी सत्ताधाऱ्यांची चांगलीच शाब्दिक धुलाई केली आहे.

श्री. निकम यांच्या या डेरिंगबाज तथा कणखर भूमिकेबाबत काहींनी आनंद व्यक्त केला आहे, तर काहींनी तीव्र नाराजीही व्यक्त केली आहे.

श्री. निकम यांच्या मते २४ वर्षांपासून पाण्याच्या टाक्यांची साफसफाई झालेली नाही. तेथील गाळ काढण्यात आलेला नाही. त्यामुळे ते पाणी दूषित व नागरिकांच्या आरोग्यासाठी धोकादायक असल्याचे स्पष्ट केले आहे. यासाठी त्यांनी २४ वर्षांतील सर्व नगराध्यक्ष तथा सत्ताधाऱ्यांना जबाबदार धरून त्यांना अत्यंत स्पष्ट शब्दांत विचारणा करून त्यांना जनमानसात उघडे पाडले आहे. खरेतर २४ वर्षांत जे नगरसेवक, नगराध्यक्ष आणि सत्ताधारी झाले... ज्यांच्याकडे सत्ता होती त्यांच्यात माजी आमदार कृषिभूषण साहेबरावदादा पाटील, आमदार अनिलदादा पाटील, इतकेच नव्हे तर ज्यांच्या नेतृत्वाखाली श्री. निकम पालिकेत कार्यरत आहेत ते माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांचा समावेश आहे. तसेच हल्ली सत्ताधारी पक्षात पक्षातील अनेक नगरसेवक हे या २४ वर्षांच्या काळात दोन, तीन किंवा चार वेळा नगरसेवक राहिले आहेत. या सर्वांची कोणतीही तमा न बाळगता श्री. निकम यांनी त्यांची चांगलीच शाब्दिक धुलाई केली आहे. श्री. निकम यांच्या या धाडसाबद्दल अनेकांनी त्यांचे कौतुक केले आहे. तर मागील काही सत्ताधारी, नगराध्यक्ष व नगरसेवकांनी मात्र हा श्री. निकम यांचा बालिशपणा व ओव्हर स्टंटबाजी असल्याचा प्रत्यारोप केला आहे. नागरिकांच्या सर्व नागरी सुविधा उपलब्ध करून देणे जसे की साफसफाई, दिवाबत्ती, पाणीपुरवठा या सर्व पालिकेच्या जबाबदाऱ्या आहेत. या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी पालिकेत पगार घेणारे अनेक



कर्मचारी आणि अधिकारी आहेत. याबाबतीतील सर्वाधिक जबाबदारी ही पालिकेतील मुख्याधिकारी, विविध अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची आहे. नगरसेवकांनीही या सर्व सुविधांकडे लक्ष दिले पाहिजे हे खरे आहे. मात्र, गटारी, स्वच्छतागृहे साफ करणे, रस्ते झाडणे, टाक्यांची साफसफाई करणे, विजेच्या खांबांवर चढून दिवे लावणे हे नगरसेवक, नगराध्यक्ष किंवा राज्यकर्त्यांचे काम नाही. त्यासाठी कर्मचाऱ्यांनी आपले कर्तव्य चोख बजावणे गरजेचे असते. श्री. निकम यांनी मात्र या सर्व बाबींसाठी मागील सत्ताधारी आणि नगरसेवकांना जबाबदार धरले आहे. त्याबद्दल अनेकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. इतकेच नव्हे; तर नगराध्यक्षांना सोयीस्कररित्या टाळून हे सारे काही कशासाठी सुरू आहे? असाही जाब काहींनी विचारला आहे. सुमारे चार वर्षे पालिकेत प्रशासकाचे राज्य होते. त्या काळातील मुख्याधिकारी व पालिकेतील जबाबदार अधिकारी काय करत होते? त्यांनाही श्री. निकम यांनी जाब विचारणे किंवा त्यांच्यावरही टीका करणे अपेक्षित होते. तसेच श्री. निकम यांच्या म्हणण्याप्रमाणे गेली २४ वर्षे ज्या मुख्याधिकारी, अधिकारी व संबंधित कर्मचाऱ्यांनी टाक्यांची साफसफाई न करून नागरिकांच्या जीवाशी खेळले त्यांच्यावर गुन्हे दाखल करणे किंवा कर्तव्य कसुरीबद्दल कठोर कारवाई व्हावी यासाठीही श्री. निकम परखड भूमिका घेतील की फक्त राजकीय मंडळींवरच दोषारोप करून शांत बसतील हे आगामी काळात लक्षात येईलच. श्री. निकम यांनी सत्ताधाऱ्यांपेक्षाही पगारी कर्मचाऱ्यांबाबत कठोर भूमिका घ्यावी, असे अनेकांनी मत व्यक्त केले आहे. मात्र, काहींवरील राजकीय राग व उत्साहाच्या भरात आणि पालिकेच्या कार्यपद्धतीची फारशी माहिती नसल्यामुळे श्री. निकम यांनी सर्रास सत्ताधाऱ्यांवर केलेली आगपाखड हल्ली त्यांच्यासोबत असलेल्यांसह माजी राज्यकर्त्यांना मुळीच रुचलेली नाही. नगराध्यक्षपदासाठीचे पराभूत उमेदवार जितेंद्र ठाकूर यांनी २४ ऐवजी १४ वर्षांपूर्वी टाक्या साफ झाल्या होत्या, असे स्पष्ट केले आहे. दरम्यान, हल्ली एकच टाकी साफ झाली आहे. बाकी टाक्या साफ होणे गरजेचे आहे. या सर्व आरोप-प्रत्यारोपांच्या फैरींमध्ये आणि गदारोळामध्ये उर्वरित टाक्याही लवकरात लवकर साफ व्हाव्यात, नागरिकांचे आरोग्य सुरक्षित राहावे, त्यांना अत्यावश्यक सर्व सोयी-सुविधा मिळाव्यात, त्यात कोणीही राजकारण आणू नये, चमकोगिरी तर मुळीच करू नये, राज्यकर्त्यांसोबतच किंवा त्यापेक्षाही अधिक पालिकेतील मुख्याधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी यांनी आपली कर्तव्य बजावणी वेळोवेळी आणि चोखपणे करावी, विरोधी पक्षानेही कणखर भूमिका घेऊन राज्यकर्त्यांवर अंकुश ठेवणे व त्यांच्याकडून कर्तव्य बजावणी करून घेणे अत्यंत गरजेचे आहे, अशी अपेक्षा नागरिकांकडून केली जात आहे. दरम्यान, श्री. निकम यांना याबाबत प्रतिक्रियेसाठी संपर्क साधला असता त्यांनी कॉल रिसिव्ह केला नाही आणि नंतर मोबाईल स्विच ऑफ केला. तर नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर यांनी त्यांना टाळून पालिकेत खूप काही सुरू असले तरी त्यावर कोणतीही नाराजी व्यक्त न करता अत्यंत संयमित आणि सुसंस्कृतपणे प्रतिक्रिया देताना सांगितले, की श्री. निकम चांगले काम करीत आहेत. आता अन्य टाक्याही साफ करण्याचे काम हाती घेतले जाईल.

# एकल महिलांच्या आयुष्यात आशेचा दीप

## राजरथ फाउंडेशनकडून शैक्षणिक साहित्याची अनोखी भेट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील राजरथ फाउंडेशनतर्फे जागतिक एकल महिला दिनानिमित्त संघर्षमय आयुष्य जगणाऱ्या एकल महिला, त्यांची मुले आणि अनाथ बालकांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलविणारा हृदयस्पर्शी उपक्रम राबविण्यात आला. साऊ एकल महिला समिती महाराष्ट्र यांच्या मार्गदर्शन व प्रेरणेने आयोजित या कार्यक्रमात ग्रामीण भागातील एकल महिलांचा आणि त्यांच्या पाल्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी महिलांसह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष प्रा. सुनील पाटील आणि ग्लोबल स्कूलच्या शिक्षिका पायल पाटील दरवर्षी समाजातील गरजू विद्यार्थ्यांसाठी अशा संवेदनशील उपक्रमांचे आयोजन करतात. यंदाही अनेक विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य भेट देत त्यांच्या शिक्षणाला बळकटी देण्याचा प्रयत्न करण्यात आला. राजरथ फाउंडेशनकडून दरवर्षी सुमारे ५० विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारले जाते. एवढेच नव्हे; तर वर्षभर या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक गरजांमध्ये संस्था खंबीरपणे पाठीशी उभी राहते.

कार्यक्रमादरम्यान पायल पाटील यांनी उपस्थित एकल महिलांना क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची



*अमळनेर : राजरथ फाउंडेशनतर्फे जागतिक एकल महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात महिला व त्यांच्या पाल्यांच्या सन्मानावेळी उपस्थित संस्थाध्यक्ष प्रा. सुनील पाटील, ग्लोबल स्कूलच्या शिक्षिका पायल पाटील आदी.*

पुस्तिका भेट देत त्यांचा सन्मान केला. तसेच शासनाच्या विविध कल्याणकारी योजना, बालसंगोपन योजना आणि खासगी क्षेत्रातील शिष्यवृत्तींबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. काही पात्र मुलांसाठी बालसंगोपन योजनेचे अर्जही भरून घेण्यात आले.

संस्थेच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे आजपर्यंत अनेक एकल पाल्य व अनाथ मुलांना महिला व बालविकास विभागामार्फत दरमहा २,२५० रुपयांचा लाभ मिळवून देण्यात आला आहे. तसेच अनेक महिलांना राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजना आणि संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळाला आहे. 'कोरोना'काळात पती गमावलेल्या १५ महिलांना शिवणयंत्र वाटप करून स्वावलंबनाचा मार्ग उपलब्ध करून देण्यात आला. याशिवाय अनेक महिलांना आवश्यक शासकीय कागदपत्रे मिळवून देण्यासाठीही संस्थेने पुढाकार घेतला आहे.

आजपर्यंत विधवा, परित्यक्ता आणि घटस्फोटित अशा २०० हून अधिक एकल महिलांची नोंदणी संस्थेकडे झाली असून, त्यांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी सातत्याने काम सुरू असल्याची माहिती संस्थेने दिली. गरजू एकल महिलांनी मदतीसाठी ९४०५०५१७०० किंवा ९९७५२८८६१६ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहनही संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

# स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत पालिकेस अत्याधुनिक सक्शनकम जेटिंग मशीन प्राप्त

## नगराध्यक्ष डॉ. बाविस्कर यांचा प्रयत्न; शहरातील स्वच्छता व्यवस्थेला मिळणार बळ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील स्वच्छता व्यवस्थेचे आधुनिकीकरण, सांडपाणी व्यवस्थापनाची कार्यक्षमता वाढविणे तसेच नागरिकांना अधिक दर्जेदार व परिणामकारक स्वच्छता सुविधा उपलब्ध करून देणे, या उद्देशाने स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरिक २.०) अंतर्गत येथील पालिकेस अत्याधुनिक सक्शनकम जेटिंग मशीन वाहन प्राप्त झाले आहे. त्यामुळे शहरातील मुख्य गटारी, नाले, सांडपाणी वाहिन्या व जलनिःस्सारण यंत्रणेतील गाळ, कचरा व अडथळे अत्यंत प्रभावीपणे दूर करणे शक्य होणार असून, मॉन्सूनपूर्व नियोजन, सार्वजनिक आरोग्यसंवर्धन व पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने देखील या वाहनाचा मोठ्या प्रमाणावर लाभ होणार आहे. स्वच्छ, सुंदर, निरोगी व विकसित अमळनेर शहर घडविण्याच्या संकल्पनेला बळकटी



*अमळनेर : स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत पालिकेस नुकतेच अत्याधुनिक सक्शनकम जेटिंग मशीन प्राप्त झाले. यावेळी उपस्थित नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, नगरसेवक महेश देशमुख, स्वच्छता निरीक्षक संतोष जाधव, किरण कंडारे, संतोष माणिक आदी.*

देणारे हे वाहन शहराच्या स्वच्छता व्यवस्थेमध्ये नवीन अध्याय निर्माण करणारे ठरणार आहे. या मशीन प्राप्तीसाठी नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर यांनी प्रयत्न केले. डॉ. बाविस्कर हे आपल्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली शहराच्या सर्वांगीण विकासासाठी विविध लोकाभिमुख व नागरिक केंद्रित उपक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. त्यामध्ये शहराच्या स्वच्छता व्यवस्थेला अधिक सक्षम, गतिमान व तंत्रज्ञानाधारित बनविण्याच्या दृष्टीने प्राप्त झालेले हे अत्याधुनिक वाहन एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे.

## दिनविशेष

२६ जून

- नागपूरजवळील कोराडी येथील तत्कालीन सर्वात मोठ्या वीजनिर्मिती केंद्रातून वीजनिर्मिती सुरू झाली.
- नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्याचे विभाजन करून माहूर या नवीन तालुक्याची निर्मिती करण्यात आली.
- शिवाजी राजांची मुद्रा असलेले नाणे चलनात आले.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!

जय भारत...!
जय स्वदेशी...!!

## दुचाकीवरून पडल्याने महिलेचा मृत्यू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : देवपूर-धुळे येथील रहिवासी योगेश साळुंखे हे रविवार, दि. १४ जून रोजी पत्नी विशाखा यांच्यासमवेत दुचाकीवरून (एमएच १८-एयू ७७४७) बुधगाव (ता. चोपडा) येथून नातेवाईकांकडील दशक्रिया विधी आटोपून भरवस रस्त्याने जात होते. यावेळी ते भरवसजवळील रस्त्यावरील खड्ड्यात पडले. त्यात पत्नी विशाखा यांच्या डोक्याला गंभीर इजा झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. दुचाकीवरून पडल्याने मागे बसलेल्या महिलेचा मृत्यू झाला. याबाबत मारवड पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# सोने-चांदी स्वस्त होणार की महाग?

## अमेरिकेने जगाला दिला धक्का; जुलैमध्ये काय असेल भाव? अंदाजाने सर्व चक्रावले

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सध्या संपूर्ण जगभरात सोन्याच्या किमती चर्चेचा विषय ठरत आहेत. भारतात सोन्याचा भाव १० ग्रॅममागे सुमारे १.४५ लाख रुपयांच्या पातळीवर पोहोचला आहे. तर चांदीचा दर प्रतिकिलो सुमारे २.३३ लाख रुपयांच्या आसपास आहे. अशा परिस्थितीत सर्वात मोठा प्रश्न असा निर्माण झाला आहे की, सोने आता खूप महाग झाले आहे का, की त्यात अजूनही तेजीची संधी शिल्लक आहे?

या प्रश्नाचे उत्तर जगातील मोठ्या गुंतवणूकदारांच्या ताज्या मतांमध्ये दडलेले आहे. बँक ऑफ अमेरिकेच्या 'ग्लोबल फंड मॅनेजर सर्व्हे'ने सोन्याबाबत असा संकेत दिला आहे ज्यामुळे बाजारात मोठी चर्चा सुरू झाली आहे. आर्थिक बाजाराशी संबंधित लोक या सर्वेक्षणाची आतुरतेने वाट पाहत असतात.

बँक ऑफ अमेरिकेच्या ताज्या सर्वेक्षणानुसार सोन्याला ओव्हरव्हॅल्यूड म्हणजेच आवश्यकतेपेक्षा जास्त महाग समजणाऱ्या गुंतवणूकदारांची संख्या २०२४ च्या सुरुवातीपासूनच्या सर्वात खालच्या पातळीवर आली आहे. सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास जगातील मोठे फंड मॅनेजर्स आता असे मानत नाहीत की सोने त्याच्या क्षमतेपेक्षा खूप वर गेले आहे.

याचा अर्थ असा, की विक्रमी उच्चांकावर पोहोचल्यानंतरही सोन्याबाबतची भीती कमी झाली असून गुंतवणूकदारांचा विश्वास वाढला आहे. गेल्या अडीच वर्षांतील ही पहिलीच वेळ आहे की, इतक्या उच्च पातळीवर असूनही सोन्याकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहिले जात आहे.



### 'ओव्हरव्हॅल्यूड' म्हणजे नेमके काय?

जेव्हा एखाद्या मालमत्तेची किंमत इतकी वाढते की गुंतवणूकदारांना वाटू लागते की आता त्यात पुढे वाढीची फारशी संधी उरलेली नाही, तेव्हा त्या मालमत्तेला ओव्हरव्हॅल्यूड म्हटले जाते. मात्र बँक ऑफ अमेरिकेच्या सर्वेक्षणात दिसून आलेला बदल सांगतो की मोठे गुंतवणूकदार अजूनही सोन्यात मोठ्या वाढीची शक्यता पाहत आहेत. त्यामुळेच सोन्याबद्दल त्यांचा दृष्टिकोन अधिक सकारात्मक झाला आहे.

### विक्रमी दर असूनही विश्वास का वाढला?

हा प्रश्न सध्या प्रत्येक गुंतवणूकदाराच्या मनात आहे. साधारणपणे एखादी मालमत्ता सातत्याने विक्रमी पातळीवर जात असेल तर गुंतवणूकदारांना नफावसुली आणि घसरणीची भीती वाटू लागते. मात्र सोन्याच्या बाबतीत चित्र वेगळे आहे. सर्वेक्षणानुसार जागतिक आर्थिक अनिश्चितता, भू-राजकीय तणाव, केंद्रीय बँकांकडून सुरू असलेली मोठ्या प्रमाणातील खरेदी आणि सुरक्षित गुंतवणुकीची वाढती मागणी यामुळे सोन्याच्या दरांना मोठा आधार मिळत आहे. हेच घटक पुढील काळातही सोन्याच्या तेजीला चालना देऊ शकतात. त्यामुळे किमती महाग असल्या तरी गुंतवणूकदारांचा विश्वास कायम आहे.

### जुलै २०२६ मध्ये सोन्याचा भाव कुठे जाऊ शकतो?

सध्या भारतात सोन्याचा भाव १० ग्रॅममागे सुमारे १.४५ लाख रुपये आहे. डॉलर-रुपया विनिमय दर जवळपास ९५ रुपये असल्याने आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमतींचा भारतीय बाजारावर मोठा प्रभाव पडत आहे. विविध ब्रोकरेज हाऊसेसच्या अहवालानुसार जुलै महिन्यातही सोन्याचा कल सकारात्मक राहण्याची शक्यता आहे. अंदाज वेगवेगळे असले तरी बहुतांश संस्थांना सोन्यातील मजबुती कायम राहील, असे वाटते.

### बँक ऑफ अमेरिका काय म्हणते?

बँक ऑफ अमेरिकेच्या मते सोने अजूनही गुंतवणूकदारांसाठी मजबूत हेज म्हणजेच संरक्षण कवच म्हणून काम करत आहे. अहवालानुसार कोणत्याही कारणामुळे सोन्याच्या किमतींमध्ये मोठी घसरण झाली तरी खरेदीदार पुन्हा सक्रिय होऊ शकतात. मोठ्या गुंतवणूकदारांचे मत आहे की, दर घसरले तरी मागणी टिकून राहण्याची शक्यता आहे. बँक ऑफ अमेरिकेने २०२६ साठी सोन्याचा सरासरी भाव ४,५३८ डॉलर प्रति औंस राहील असा अंदाज व्यक्त केला आहे. जर तेजी आणखी मजबूत झाली तर सोन्याचा भाव ५,००० डॉलर प्रति औंसपर्यंत जाऊ शकतो.

### गोल्डमन सॅक्सचा अंदाज

जगातील अग्रगण्य गुंतवणूक

पान २ वर

## संपादकीय

# सत्तेच्या दारी सत्तेची तोरणे

विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांमधील निवडणुकीत सत्ताधारी महायुतीला मिळालेले 'शत प्रतिशत' यश अपेक्षित होतेच. गेल्या वर्षी महापालिका, नगरपालिका आणि मोजक्या जिल्हा परिषदांच्या निवडणुकांमध्ये महायुतीला घवघवीत यश मिळाले; तेव्हाच या मतदारांवर लढल्या जाणाऱ्या विधान परिषदेच्या जागांवरील विजयावरसुद्धा शिक्कामोर्तब झाले होते. एकूण १७ जागांसाठी झालेल्या या निवडणुकीत सर्व जागा महायुतीच्या पदरात पडल्या. त्यामध्ये भारतीय जनता पक्षाने सर्वाधिक ११, शिवसेनेने ३ आणि राष्ट्रवादी काँग्रेसने २ जागांवर विजय मिळविला. नाशिकमधील बंडखोर उमेदवारही महायुतीच्याच एखाद्या गोटात सहभागी होणार आहेत. अमरावतीमध्ये मात्र काँग्रेसच्या उमेदवाराने शून्य मते मिळवून आगळाच 'विक्रम' केला आहे. सत्ताधाऱ्यांचा वारू या निवडणुकीतही चौखूर उधळला असला, तरी त्यामागील दबावतंत्र, प्रलोभने आणि घोडेबाजाराच्या चर्चा लोकशाहीच्या स्मारकावर आणखी विटा चढवणाऱ्या आहेत, हे मात्र नक्की.

'सगळेच रस्ते रोमकडे जातात,' या म्हणीनुसार हल्ली सर्वपक्षीय मतदार हे सत्ताधाऱ्यांकडेच येतात, हे वास्तव आहे. त्याच न्यायाला अनुसरून या १७ पैकी ६ जागांवर विरोधी उमेदवारांनी लढण्याआधीच शस्त्रे टाकली होती. ठाणे, कोकण, पुणे, अहिल्यानगर, यवतमाळ आणि वर्धा–गडचिरोली व चंद्रपूर या जागांवर कुठे काँग्रेस तर कुठे 'उबाठा' गटाच्या उमेदवारांनी अर्ज माघारी घेतले. शरद पवार गटाने तर महाविकास आघाडीत भांडून मिळवलेली उमेदवारी शेवटी सत्ताधाऱ्यांच्याच चरणी अर्पण केली. एका उमेदवाराने तर 'घोडेबाजार रोखण्यासाठी' असा अजब मुलामा लावून आपल्या माघारीचे निलाजरे समर्थनही केले. त्यामुळे उमेदवार किंवा त्यांचे नेते फायद्यात असले, तरी बहुसंख्य मतदारांचा तोटा झाल्याची खंत आणखी सहा वर्षे तरी कायम राहील. अशा पार्श्वभूमीवरील उर्वरीत ११ जागांवरील महायुतीचा विजय, ही औपचारिकताच उरली होती. तेथेही गुप्त मतदानामुळे अनेक मतदारांना 'अंतरात्म्याचा आवाज' ऐकून 'सद्सद्विवेकबुद्धी' वापरण्याची संधी मिळाली. त्यासाठी सत्ताधाऱ्यांकडून योग्य तो 'वर' मिळाला होताच; त्यामुळेच बहुसंख्य उमेदवार पहिल्याच फेरीत विजयी झाल्यास नवल ते काय! अमरावतीमध्ये भाजपचे प्रवीण पोटे यांच्यासाठी तर अंमळ जास्तच 'प्रसादवाटप' झाले असावे; त्यामुळेच विरोधी काँग्रेसची ११९ मते असताना त्यांच्या उमेदवाराला भोपळाही फोडण्याची संधी मिळाली नाही. वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारानेही ३१ मते मिळविली, हे लक्षणीय म्हणावे लागेल.

एकीकडे 'शिंदे सेने'च्या 'ऑपरेशन टायगर'ला यश मिळत असताना तेथे मंत्री गिरीश महाजन यांचे चेले गोकुळ गिते यांनी शिंदे सेनेचे उमेदवार नरेंद्र दराडे यांचा पराभव केल्याने महायुतीमधील रस्सीखेच उघड झाली. मात्र, आपल्याच उमेदवाराला धूळ चारणाऱ्या गिते यांना खास विमानाने पाचारण करून शिंदे गटाने घातलेल्या पायघड्या आणि पराभूत उमेदवार दराडे यांनी बड्या नेत्यांची नावे घेऊन 'आमचेच पैसे वाटून सर्वांनी गद्दारी केली,' या आरोपाचे पडसादही उमटत राहणार, हे नक्की. काही काळापूर्वीच जिल्हा परिषदेच्या निवडणुकीतील नाट्य आणि मंत्र्यांनाही झालेल्या धक्काबुक्कीच्या पार्श्वभूमीवर सातारा–सांगलीमध्ये विजय झाला असला, तरी विरोधी महाविकास आघाडीच्या पारड्यात पडलेली महायुतीची शंभराहून अधिक मते वेगळा संदेश देणारी आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांमधून विजयाचा गुलाल उधळून महायुतीने आपली पाळेमुळे अधिकच घट्ट केली आहेत. दुसरीकडे विरोधकांना मात्र दिवसेंदिवस भिंग लावून आपले अस्तित्व शोधण्याची वेळ आली आहे, एवढे या निकालाने पुन्हा एकदा दाखवून दिले. लोकांच्या मतांवर निवडून येणाऱ्या विधानसभेच्या आमदारांवर अंकुश ठेवणारे; वेळप्रसंगी त्यांनाही समजुतीचे बोल ऐकविण्याची क्षमता असलेले 'वरिष्ठांचे सभागृह' ही विधान परिषदेची ओळख. ग. प्र. प्रधान, ग. दि. माडगूळकर यांच्यापासून ते सत्ताधाऱ्यांना धारेवर धरणारे बी. टी. देशमुख आणि नितीन गडकरी अशा विविध क्षेत्रांतील मान्यवरांची परंपरा लाभलेल्या या सभागृहात बड्या नेत्यांचे कुटुंबकबिले आणि धनाढ्यांचा गोतावळा जमला आहे. त्यातच 'मतदारांची कामे,' असा मंत्र जपत सगळेच सत्ताधाऱ्यांपुढे नांगी टाकताना दिसत आहेत. अशा वेळी या सभागृहात कोणी कोणाचे कान पिळावेत, असा प्रश्न पडल्यास नवल नाही.

# अमळनेर ग्रामीण रुग्णालयासाठी २० अतिरिक्त पदे मंजूर

## आमदार पाटील : उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा; तज्ज्ञ ४ डॉक्टरांसह कर्मचारी वाढणार

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



अमळनेर : येथील ग्रामीण रुग्णालयाचे उपजिल्हा रुग्णालय म्हणून श्रेणीवर्धन झाले आहे. त्यामुळे २० अतिरिक्त पदांना राज्य शासनाच्या आरोग्य विभागाने मंजुरी दिली आहे. त्या अनुषंगाने आता ४ तज्ज्ञ डॉक्टर व इतरही कर्मचारी वाढून येथील आरोग्य सेवा अधिक वृद्धिंगत होईल, अशी माहिती माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांनी दिली.

याबाबत शासनाचा आदेश दि.२४ जून २०२६ रोजी प्रसिद्ध झाला असून, यात राज्यातील काही रुग्णालयांचा समावेश आहे. राज्यातील ५० टक्क्यांपेक्षा जास्त बांधकाम झालेल्या नवनिर्मित अथवा श्रेणीवर्धीत आरोग्य संस्थेकरिता पदनिर्मिती करण्यात आली असून, अमळनेर ग्रामीण रुग्णालयाचे उपजिल्हा रुग्णालय म्हणून श्रेणीवर्धन झाल्यानंतर त्याचे बांधकामही ९० टक्के पूर्ण झाले असल्याने या पदवाढीस मंजुरी मिळाली आहे. विशेष म्हणजे आमदार पाटील यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे तब्बल २४ वर्षांनंतर ही



पदांची वाढ झाली आहे.

**रुग्णांना मिळणार लाभ**

अमळनेर ग्रामीण रुग्णालयात आधी एकूण २९ पदे होती. त्यात एक वर्ग–१ चे वैद्यकीय अधीक्षक १, वर्ग– २ चे ३ वैद्यकीय अधिकारी आणि इतर कर्मचाऱ्यांचा समावेश होता. आता २० पदे वाढली आहेत. त्यात ४ डॉक्टर असतील. यामध्ये १ सर्जन, १ फिजिशियन आणि २ एमबीबीएस डॉक्टरचा समावेश असेल. याशिवाय इतर नर्सिंग व अन्य कर्मचारी असतील. सदर रुग्णालयात एनएचएम अंतर्गत कंत्राटी २० कर्मचारी आधीचे आहेत. म्हणजेच आरोग्यसेवेची मोठी टीम या रुग्णालयात आता कार्यरत असणार आहे.

दरम्यान, अमळनेर ग्रामीण रुग्णालयाचे उपजिल्हा रुग्णालयात रूपांतर करण्यासाठी आमदार पाटील यांनी पाठपुरावा केल्याने त्यास यश आले. त्यानंतर प्रत्यक्ष बांधकाम देखील सुरू होऊन तेही पूर्णत्वास येण्याच्या मार्गावर आहे. आता आमदारांच्याच प्रयत्नांनी पदे देखील वाढल्याने अमळनेर परिसरातील रुग्णांना मोठा लाभ होणार आहे. याकामी पाठपुरावा करण्यासाठी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रकाश ताडे व इतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले. या मंजुरीबद्दल आमदार पाटील यांनी मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना. श्रीमती सुनेत्राताई पवार, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, जलसंपदामंत्री गिरीश महाजन, जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे आभार मानले आहेत.

# पत्रकारांचा अवमान सहन केला जाणार नाही

## खासदार संजय दिना पाटील यांच्या वक्तव्याचा व्हॉईस ऑफ मीडियाकडून तीव्र निषेध

Voice of Media
Fight for journalists and journalism

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

### राज्यभर आंदोलन करण्याचा संदीप काळे यांचा इशारा



मुंबई : शिवसेना (शिंदे गट) चे खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकाराबाबत केलेल्या कथित अपमानास्पद वक्तव्याचा व्हॉईस ऑफ मीडिया, व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरमने तीव्र निषेध केला असून, या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सविस्तर निवेदन पाठवून तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे.

संस्थापक तथा आंतरराष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांच्या स्वाक्षरीने पाठविण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पत्रकार हे लोकशाहीचे चौथे स्तंभ असून शासन, प्रशासन आणि जनतेमधील संवादाचा महत्त्वाचा दुवा आहेत. अशा परिस्थितीत लोकप्रतिनिधींकडून पत्रकारांबाबत अपमानास्पद भाषा वापरणे ही अत्यंत गंभीर बाब असून ती लोकशाही मूल्यांना धरून नाही.

निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, पत्रकारांना प्रश्न विचारण्याचा, माहिती जाणून घेण्याचा आणि जनतेसमोर सत्य मांडण्याचा घटनात्मक अधिकार आहे. पत्रकारांनी आपली व्यावसायिक जबाबदारी पार पाडताना त्यांच्याविषयी अवमानकारक शब्दप्रयोग करणे किंवा त्यांना लक्ष्य करणे हे मुक्त पत्रकारितेच्या वातावरणासाठी घातक ठरू शकते.

एखाद्या बातमीबाबत किंवा प्रश्नाबाबत मतभेद असू शकतात; मात्र त्यासाठी पत्रकारांचा अपमान करणे अथवा त्यांची प्रतिष्ठा कमी करण्याचा प्रयत्न करणे कोणत्याही लोकशाही व्यवस्थेत स्वीकारार्ह नाही. अशा प्रकारच्या विधानांमुळे पत्रकारांच्या सुरक्षिततेबाबत चिंता निर्माण होण्याची शक्यता असून समाजात पत्रकारांविषयी चुकीचा संदेश जाऊ शकतो.

या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घ्यावी, संबंधित खासदारांकडून सार्वजनिक दिलगिरी व्यक्त करण्यास सांगावे आणि पत्रकारांचा सन्मान व सुरक्षितता अबाधित राहील यासाठी शासनाने स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

संदीप काळे यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्राला पुरोगामी विचारांची आणि मुक्त अभिव्यक्तीची समृद्ध परंपरा लाभली आहे. पत्रकारितेचा सन्मान राखणे ही लोकशाहीची मूलभूत गरज आहे. पत्रकारांवर होणारे शाब्दिक हल्ले, धमक्या किंवा अवमान याविरोधात सर्वच स्तरांवर ठाम भूमिका घेणे आवश्यक आहे.

दरम्यान, या निवेदनाच्या प्रती राज्य शासनातील वरिष्ठ अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, पोलीस महासंचालक तसेच संबंधित पक्ष नेतृत्वालाही पाठविण्यात आल्या असल्याची माहिती व्हॉईस ऑफ मीडिया इंटरनॅशनल फोरमच्या वतीने देण्यात आली. व्हॉईस ऑफ मीडिया व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरमचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल मस्के यांनी या प्रकरणी राज्यभर आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

पत्रकारांचा सन्मान आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी राज्य शासनाने या प्रकरणात त्वरित आणि ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा पत्रकार संघटनांकडून व्यक्त करण्यात येत आहे.



अमळनेर : 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर मोफत पास योजने'च्या जनजागृतीवेळी साने गुरुजी विद्यामंदिरातील विद्यार्थिनींसमवेत एस.टी. महामंडळाचे आगारप्रमुख प्रमोद चौधरी, सहाय्यक वाहतूक अधीक्षक क्षीरसागर, वाहतूक निरीक्षक सैंदाणे आणि वरिष्ठ लिपिक पाटील आदी.

# होळकर मोफत पास योजनेची विद्यार्थिनींना दिली माहिती

## एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडून साने गुरुजी विद्यामंदिरात जनजागृती

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : राज्य शासनामार्फत ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणाला चालना देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर मोफत पास योजने'विषयी विद्यार्थिनींमध्ये जनजागृती करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी साने गुरुजी विद्यामंदिर शाळेला भेट देत योजनेची सविस्तर माहिती दिली. यावेळी विद्यार्थिनींना मोफत प्रवास सवलतीचा लाभ कसा घेता येईल, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

राज्य शासनाच्या या महत्त्वाकांक्षी योजनेंतर्गत ग्रामीण भागातील इयत्ता ५ वी ते १२ वीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना त्यांच्या गावापासून शाळेपर्यंत ये–जा करण्यासाठी एसटी बसमधून १०० टक्के मोफत प्रवास सवलत दिली जाते. या योजनेमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना शिक्षणासाठी होणारा प्रवास खर्च वाचण्यास मदत होत असून, मुलींचे शाळेत जाण्याचे प्रमाण वाढविण्यासाठीही ही योजना उपयुक्त ठरत आहे. योजनेची माहिती अधिकाधिक विद्यार्थिनींपर्यंत पोहोचावी आणि पात्र लाभार्थींनी या सुविधेचा लाभ घ्यावा, या उद्देशाने एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी साने गुरुजी विद्यामंदिर शाळेला भेट दिली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक संजीव पाटील यांच्याकडे मोफत पास योजनेचे अर्ज सुपूर्द करण्यात आले. तसेच विद्यार्थिनींना अर्ज भरण्याची प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे आणि पास मिळविण्याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. याप्रसंगी आगारप्रमुख प्रमोद चौधरी, सहाय्यक वाहतूक अधीक्षक संदेश क्षीरसागर, वाहतूक निरीक्षक मुकेश सैंदाणे आणि वरिष्ठ लिपिक तुषार पाटील उपस्थित होते. उपस्थित अधिकाऱ्यांनी शासनाच्या विविध प्रवासी कल्याणकारी योजनांची माहिती देत विद्यार्थिनींनी या योजनेचा लाभ घेऊन शिक्षणाचा प्रवास अधिक सुलभ करावा, असे आवाहन केले.

शाळा प्रशासनानेही या उपक्रमाचे स्वागत करत विद्यार्थिनींना योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक सहकार्य करण्याची ग्वाही दिली. शासनाच्या या योजनेमुळे ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणाला बळ मिळणार असून, आर्थिक अडचणींमुळे शिक्षणात खंड पडण्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# एकल महिलांच्या समस्या तत्काळ सोडवा

## विविध फाऊंडेशनची नायब तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे मागणी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : तालुक्यातील एकल महिलांच्या समस्या तातडीने सोडवून त्यांना हक्क, सन्मान व स्वावलंबन मिळवून देण्यासाठी प्रशासनाने विशेष प्रयत्न करावेत, अशी मागणी एकल महिलांनी उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी तसेच पालिका मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. सदर निवेदन नायब तहसीलदार सी. यू. पाटील यांनी स्वीकारले.

त्यात म्हटले आहे, की तालुक्यातील अनेक एकल महिला व अनाथ मुलांचे बालसंगोपनाचे प्रस्ताव विविध कार्यालयांमध्ये प्रलंबित असून त्यांचा तातडीने निपटारा करण्यात यावा. तसेच नगर विकास विभागाच्या २९ मार्च २०२२ च्या शासन निर्णयानुसार नगर परिषद व नगर पंचायतींकडील ५ टक्के निधीतून एकल महिलांना विविध योजनांचा लाभ त्वरित देण्यात यावा. याशिवाय जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या उपलब्ध निधीतून एकल महिला सक्षमीकरणासाठी विशेष प्रयत्न करावेत, दर तीन महिन्यांनी रोजगार मेळावे आयोजित करून महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, एकल महिलांसाठी स्वतंत्र बचत गट स्थापन करण्यात यावेत तसेच शासकीय कार्यालयांमध्ये एकल महिलांना सन्मानपूर्वक वागणूक मिळावी, तशा सूचना संबंधित विभागांना देण्यात याव्यात.

यावेळी एकल महिला समिती महाराष्ट्र, राजरथ फाउंडेशनचे सुनील पाटील, सौ. पायलताई पाटील व साने गुरुजी फाउंडेशनचे नरेंद्र पाटील तसेच सौ. मनीषाताई वाणी, सौ. कविताताई पाटील, सौ. जयश्रीताई पाटील, सौ. सोनालीताई पाटील, सौ. ज्योतीताई सुतार, सौ. सुनंदाताई दाभाडे, सौ. रत्नाबाई पाटील, ॲड. योगेश कोळी, आलेश धनगर आदी उपस्थित होते.

# सोने–चांदी स्वस्त होणार की महाग?

पान १ वरून : बँक गोल्डमन सॅक्स देखील सोन्याबाबत अत्यंत सकारात्मक आहे. गोल्डमन सॅक्सच्या मते २०२६ च्या अखेरीस सोन्याचा भाव ५,४०० डॉलर प्रति औंसपर्यंत पोहोचू शकतो. जर हा अंदाज खरा ठरला तर सध्याच्या स्तरांच्या तुलनेत सोन्यात आणखी मोठी वाढ होऊ शकते. त्यामुळे अनेक गुंतवणूकदार अजूनही सोन्याकडे दीर्घकालीन गुंतवणूक म्हणून पाहत आहेत.

**एचएलबीसी आणि जेपी मॉर्गनचा अंदाज**

एचएसबीसी आणि जेपी मॉर्गन सारख्या मोठ्या वित्तीय संस्थाही सोन्याबाबत सकारात्मक भूमिका घेताना दिसत आहेत. एका अहवालानुसार एचएसबीसी ने सोन्याचे लक्ष्य १० ग्रॅममागे सुमारे १,४४,०६८ रुपये ठेवले आहे. जेपी मॉर्गनचा दृष्टिकोन तुलनेने काहीसा सावध असला तरी त्यांनीही सोन्याबाबत नकारात्मक संकेत दिलेले नाहीत.

**भारतात सोने किती महाग होऊ शकते?**

जर बँक ऑफ अमेरिकेचा ५,००० डॉलर प्रति औंसचा अंदाज खरा ठरला आणि डॉलर–रुपया दर ९५ रुपयांच्या आसपास राहिला, तर भारतात सोन्याचा भाव १० ग्रॅममागे सुमारे १.५३ लाख ते १.५८ लाख रुपयांपर्यंत जाऊ शकतो. दुसरीकडे गोल्डमन सॅक्सचा ५,४०० डॉलर प्रति औंसचा अंदाज खरा ठरल्यास सोन्याचा भाव १.६५ लाख ते १.७० लाख रुपये प्रति १० ग्रॅमपर्यंत पोहोचू शकतो. मात्र हे अंदाज केवळ आंतरराष्ट्रीय किंमती आणि सध्याच्या डॉलर–रुपया विनिमय दरावर आधारित आहेत.

**चांदीचे काय? :** सोन्यासोबतच चांदीचे दरही विक्रमी पातळीच्या आसपास आहेत. भारतात चांदीचा भाव सध्या प्रतिकिलो सुमारे २.३३ लाख रुपये आहे. सामान्यतः सोन्यात तेजी आली की त्याचा परिणाम चांदीवरही दिसून येतो. मात्र चांदीत सोन्यापेक्षा अधिक चढ–उतार असतात.

**सामान्य गुंतवणूकदारांनी काय करावे?**

सोन्याची सध्याची परिस्थिती एक मनोरंजक चित्र समोर आणते. एका बाजूला किमती विक्रमी उच्चांकाजवळ आहेत, तर दुसऱ्या बाजूला जगातील मोठे गुंतवणूकदार सोने पूर्वीइतके महाग समजत नाहीत. त्यामुळे बाजारात आता एक मोठी चर्चा सुरू झाली आहे की, सोन्याची पुढील मोठी तेजी अजून बाकी आहे का? तज्ज्ञांचे म्हणणे आहे की कोणत्याही मालमत्तेच्या किमती सरळ रेषेत वाढत नाहीत. मध्ये–मध्ये घसरण, नफावसुली आणि अस्थिरता दिसते. मात्र बँक ऑफ अमेरिका, गोल्डमन सॅक्स, एचएसबीसी आणि जेपी मॉर्गन यांसारख्या जागतिक वित्तीय संस्थांना अजूनही सोन्यात मोठी क्षमता दिसत असल्याने बाजाराच्या दृष्टीने सोन्याची तेजी संपलेली नाही, असे वाटते.

# सामाजिक न्यायाचे प्रणेते आणि लोककल्याणकारी राजे

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

दरवर्षी २६ जून हा दिवस महाराष्ट्रात आणि देशभरात छत्रपती शाहू महाराज यांचा जन्मदिवस म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. सामाजिक समता, शिक्षणाचा प्रसार, मागासवर्गीयांचे उत्थान आणि लोककल्याणकारी राज्यकारभार यांसाठी त्यांनी दिलेले योगदान अतुलनीय आहे. त्यामुळे त्यांना 'राजर्षी शाहू महाराज' म्हणून गौरविण्यात येते. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा प्रभाव आजही भारतीय समाजव्यवस्थेवर स्पष्टपणे दिसून येतो.

**जन्म आणि प्रारंभिक जीवन**

छत्रपती शाहू महाराज यांचा जन्म २६ जून १८७४ रोजी झाला. त्यांचे मूळ नाव यशवंतराव घाटगे होते. पुढे त्यांना कोल्हापूर संस्थान येथे दत्तक घेण्यात आले आणि ते शाहू छत्रपती म्हणून ओळखले जाऊ लागले. लहानपणापासूनच त्यांना शिक्षण, प्रशासन आणि समाजकारण यांचे संस्कार लाभले. १८९४ मध्ये त्यांनी कोल्हापूर संस्थानची सूत्रे हाती घेतली आणि प्रजाहितदक्ष राज्यकारभाराला सुरूवात केली.

**सामाजिक न्यायासाठी ऐतिहासिक कार्य**

शाहू महाराजांनी समाजातील जातिभेद, अस्पृश्यता आणि सामाजिक विषमता दूर करण्यासाठी अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले. त्या काळात शिक्षण आणि नोकरीच्या संधी काही विशिष्ट वर्गांपुरत्याच मर्यादित होत्या. ही परिस्थिती बदलण्यासाठी त्यांनी मागासवर्गीय समाजाला शिक्षण व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. १९०२ मध्ये त्यांनी शासकीय नोकऱ्यांमध्ये मागासवर्गीयांसाठी ५० टक्के आरक्षण लागू केले. हा निर्णय भारतातील आरक्षण व्यवस्थेचा पाया मानला जातो. सामाजिक न्याय आणि समान संधी यांची अंमलबजावणी करणारा हा अत्यंत दूरदृष्टीचा निर्णय होता.

**शिक्षणाचा प्रसार**

शाहू महाराजांचा ठाम विश्वास होता की शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. त्यांनी सर्व समाजघटकांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. गरीब, शेतकरी, कामगार आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे, शिष्यवृत्ती आणि शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या. त्यांनी मुलींच्या शिक्षणालाही विशेष




प्रोत्साहन दिले. समाजातील दुर्बल घटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी अनेक योजना राबवल्या. त्यामुळे कोल्हापूर संस्थान शिक्षणाच्या क्षेत्रात आदर्श ठरले.

**अस्पृश्यता निर्मूलनासाठी प्रयत्न**

त्या काळात समाजात अस्पृश्यतेची प्रथा मोठ्या प्रमाणावर होती. शाहू महाराजांनी या अन्यायकारक व्यवस्थेला ठामपणे विरोध केला. त्यांनी सार्वजनिक विहिरी, धर्मशाळा, शाळा आणि इतर सुविधा सर्वांसाठी खुल्या केल्या. समाजातील प्रत्येक व्यक्तीला समान सन्मान मिळावा यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

**महापुरुषांना दिलेले प्रोत्साहन**

शाहू महाराजांनी अनेक समाजसुधारक आणि विचारवंतांना पाठबळ दिले. विशेषतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक चळवळीला त्यांनी महत्त्वपूर्ण सहकार्य केले. वंचित समाजाच्या हक्कांसाठी सुरू असलेल्या विविध उपक्रमांना त्यांनी आर्थिक आणि नैतिक पाठिंबा दिला.

**लोककल्याणकारी राज्यकारभार**

